महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!

पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.

✲ संपादक ✲

मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. - २४७ ■ मंगळवार दि. २२ एप्रिल २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

## चाळीसगाव बाजार समितीतील हमाल व तोलाई कामगारांचा बेमुदत संप?



दै. आवाज वृत्तसेवा...

**यशवंतराव ताडगे/चाळीसगाव प्रतिनिधी:-** चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाल व तोलाई कामगारांनी ३० टक्के लेव्हीसह सुधारित हमाली दर लागू करण्याच्या मागणीसाठी २२ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. हमाल कामगार युनियनने यासंदर्भात सभापती व सचिवांना अधिकृत नोटीसही बजावली आहे.

या संपामुळे मुख्य बाजार समितीतील शेतीमालाच्या लिलावावर थेट परिणाम होणार आहे. बाजार समितीतील सुमारे २५० हमाल-तोलाई कामगार आणि ६४ व्यापारी, अडते, खरेदीदार कार्यरत आ-हेत. दर तीन वर्षांनी हमाल व तोलाई कामगारांच्या मजुरीत वाढ करण्याचा निर्णय असूनही, व्यापारी वर्गाने याला विरोध दर्शविल्याचा आरोप युनियनने केला आहे.

संपाच्या पार्श्वभूमीवर सोमवार, २१ एप्रिल रोजी मुख्य बाजार आवारा-तील लिलाव बंद ठेवण्यात येणार आहे. व्यापाऱ्यांनी जागेअभावी आणि आर्थिक अडचणीमुळे लिलावात सहभाग घेणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सभापती मच्छिंद्र राठोड यांनी सांगितले की, मुख्य बाजारातील भुसार मालाचे लिलाव पुढील आदेश येईपर्यंत थांबवण्यात आले असून, कांदा बाजार (नागद रोड) तसेच पिलखोड व मेहुणबारे येथील लिलाव मात्र सुरळीत सुरू रा-हतील. शेतकऱ्यांना चाळीसगाव मुख्य बाजार समितीत अन्नधान्य किंवा भुसार माल आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

हमाल-तोलाईदारांचा हा संप उग्र होण्याची शक्यता असून, युनियनने रास्ता रोको आणि जेलभरो आंदोलनाचा इशाराही दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास बाजार समितीतील कामकाज अधिक काळ ठप्प राहू शकते.

# सटाणा बाजार समितीची सभापती, उपसभापती पदाची निवडणूक स्थगित

दै. आवाज वृत्तसेवा...

**तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी :-** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती पदासाठी सहाय्यक निबंधक जितेंद्र शेळके यांच्या अध्यक्षतेखाली बोलावण्यात आलेल्या नवनिर्वाचित १८ संचालकांपैकी सभागृहात फक्त ९ चसंचालक उपस्थित असल्याने गणपुर्ती अभावी निवडणूक प्रक्रिया राबविता येत नसल्यामुळे पुढील आदेश जारी होईपर्यंत निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात येत असल्याचा निर्णय जितेंद्र शेळके यांनी जाहीर केला. गनपुर्ती अभावी निवडणूक स्थगित करण्याची वेळ सटाणा बाजार समितीवर आल्याने आता राजकारण काय आणि काय घडामोडी घडणार याबाबत आता वेगवेगळे अंदाज बांधले जात आ-हेत.

दरम्यान, उपस्थित असलेल्या ९ संचालकांनी आजची बैठक सभापती आणि उपसभापती निवडीसाठी बोलावली आहे. गणपुर्ती अभावी निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात येईल असा कोणताही उल्लेख संचालकांना पाठवलेल्या अजेंडा मध्ये नसल्याने निवडणूक प्रक्रिया राबवा असा आग्रह धरला. पुढील बैठकिस आज उपस्थित असलेले संचालक गैरहजर राहील्यास ती मिटींग देखील गनपु-र्ती अभावी स्थगित कराल का? अशा एक ना अनेक प्रश्नांचा भडीमार उपस्थित संचालकांनी केला.

अधिका-यांनी बैठक गणपुर्ती अभावी स्थगित करण्यात आली असून



वरीष्ठांकडून पुढील निर्णय आल्यावर संचालकांना अजेंडाद्वारे कळविले जाईल असे अधिकारी शेळके यांनी सांगत सभागृहातुन काढता पाय घेतला.

३०मार्च ला बाजार समितीची निवणूक प्रक्रिया पार पडली १ एप्रिल रोजी लागलेल्या निकालात श्री यशवंत शेतकरी विकास पॅनलच्या ९ तर शेतकरी विकास पॅनलच्या ६ जागा निवडून आल्यात व्यापारी गटातून दोन तर हमाल मापारी गटातून १ असे स्वतंत्र उमेदवार निवडून आले. सोमवारी २१ एप्रिल रोजी बाजार समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसाठी बोलविण्यात आलेल्या सभेस सभागृहात १८ पैकी ९ संचालक उप-स्थित होते. त्यात शेतकरी विकास पॅनलचे डॉ. राहुल सोनवणे, प्रमोद बिरारी, सुरेखा आहीरे, विनोद आहीरे, हरि जाधव तर श्री यशवंत शेतकरी विकास पॅनल मधून निवडून आलेले रविंद्र सोनवणे यांच्यासह व्यापारी गटातून निवडून आलेले योगेश रौंदळ, दिपक सोनवणे, हमाल मापारी गटातील संदीप साळे हे संचालक उप-स्थित होते.

निवडून आलेले श्री यशवंत शेतकरी विकास पॅनलचे संचालक सिंधुताई सोनवणे, राहुल सोनवणे, दिनेश गंजाळ, गणेश ठाकरे, दिपक रौंदळ, निंबा वानले, काळुगुंजाळ, गणेश ठाकरे,, निंबा वानले, काळू जाधव, मनोहर बिरारी, यांच्यासह शेतकरी विकास पॅनल मधून निवडून आलेले किशोर खैरणार हे सभापती उपसभापती निवडी प्रसंगी अनु उपस्थित होते. सभापती उपसभापती निवडीसाठी १८ संचालकांपैकी १० संचालक उप-स्थित राहणे बंधनकारक असतांना सभागृहात ९ च संचालक उपस्थित होते. त्यात श्री यशवंत विकास पॅनलचे रविंद्र सोनवणे वगळता उर्वरीत निवडून आलेले ८ संचालक गैरहजर होते. तर शेतकरी विकास पॅनलच्या ६ संचालकांपैकी किशोर खैरणार यांनी दांडी मारल्यामुळे निवडीसाठी गणपुर्ती न झाल्याने सभा रद्द करावी लागली. निवडणुकीप्रसंगी दोघ गटांकडे प्रत्येकी ९ संचालक असल्याने मोठा ट्विस्ट निर्माण झाला होता. दगा फटका होऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सभागृहाबाहेर पोलिस निरीक्षक बाजीराव पोवार यांनी चोख पोलिस बंदोबस्त तैनात करून राज्य राखीव दलाची एक तुकडी बंदोबस्तात होती.

## नाशिकमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने संताजी-धनाजी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन





दै. आवाज वृत्तसेवा...

**निफाड, प्रतिनिधी -** प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सरसेनापती संताजी-धनाजी तसेच छत्रपती संभाजी महाराज कार्यकर्ता सन्मान सोहळ्याचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले आहे. हा भव्य सोहळा रविवार, दिनांक ४ मे २०२५ रोजी दुपारी २ वाजता रावसाहेब थोरात सभागृह, नाशिक येथे पार पडणार आहे. या सन्मान सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक आणि राज्याचे मंत्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चुभाऊ कडू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. कार्यकर्त्यांचा सन्मान व त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरावे यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला असून, या निमित्ताने प्रहार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे नाशिक जिल्हा प्रमुख शरद शिंदे यांनी केले आहे.

# सामुदायिक विवाह ही काळाची गरज - अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

दै. आवाज वृत्तसेवा...

**लक्ष्मण पवार, हतगड -** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी डांग जिल्हा गुजरात सिमेलगत खुंटविहीर येथे सत्य साई सेवा समिती कडोली, मरोली विभाग नवसारी गुजरात राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १०८ वधू वरांना आशीर्वाद देत प्रसंगी केले. या विवाह सोहळ्या प्रसंगी कळवण सुरगाणा विधानसभेचे आमदार आमदार नितीन पवार, साक्री विधानसभेच्या आमदार मंजुळा गावित,आदिवासी सेवक चिंतामण गावित, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिका राऊत, गोपाळ धुम, समीर चव्हाण, भिका राठोड, सरपंच आनंदा झिरवाळ, तुळशीराम महाले,पांडुरंग वाघमारे, नवसू गायकवाड, रामदास केंगा, रामदास गवळी,



सत्य साई सेवा समितीचे हसमुखभाई मिस्त्री, हंसाबेन मिस्त्री, शैलेशभाई पटेल, राजुभाई शाह, मोहिनीबेन वाणी, एन.डी. गावित, तहसिलदार रामजी राठोड, पोलीस निरीक्षक राहुल मोरे आदी उपस्थित होते.

सामुदायिक विवाह हि आज काळजी गरज बनली असून जेष्ठ दिवगंत कार्यकर्ते हरिभाऊ महाले यांनी ४० वर्षापूर्वी काळाची गरज ओळखून सामुदायिक विवाह सोहळ्याला सुरुवात केली होती.समाजात कपड्यांचा आहेर या अनिष्ट प्रथेवर बंदी घालणे आवश्यक असून नवरीच्या वजनापेक्षा कपड्यांचा आहेर जास्त अशी अवस्था झाली आहे. हा हकनाक खर्च टाळायला हवा. आहेर म्हणून लग्नात भेट दिलेली साडीची घडी न विस्कटता चार साड्यांच्या बदल्यात तोडून, मोडून जोडलेली प्लास्टिक भांडी घेतली जातात. हे आता बदलले पाहिजे. यावेळी जिथे पिण्यास पाणी मिळत नाही तिथे दुध विकले जाते. दुध विक्रीतून पंचवीस लाख दरमहा उत्पन्न खुंटविहर येथे घेतले जाते. हि किमया खुंटविहीरचे सरपंच आनंदा झिरवाळ यांनी करून दाखवली याबाबत कौतुक केले. या सोहळ्यात परिसरातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीते करीता खुंटविहीर, मालगोंदा, गोणदगड, उदालदरी, उंबरघोडा, मोहपाडा, गाळबारी, पिंपळसोंड, उंबरपाडा, झारणीपाडा, रानविहीर आदि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**✲ क्षणचित्रे - रणरणत्या उन्हात वधू वर मंडपात बसले होते. अतिदुर्गम, जंगल व्याप्त भागात प्रथमच हेलिकॉप्टरचे लँडीग.**

**काही वधू वर बाल गोपाळासह विवाह मंडपात बसले होते.**



दै. आवाज वृत्तसेवा...

**नांदगाव प्रतिनिधी :-** मा.वनपरिक्षेत्र अधिकारी नांदगाव प्रादेशिक हेमंत कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ कासारी वडगे, भाऊसाहेब वनरक्षक अमोल पवार, वनरक्षक नवनाथ बिन्नर, संतोष दराडे व स्थानिक ग्रामस्थ यांच्या साह्याने मौजे टाकळी (तांबेवाडी ) मधील ७० फूट खोल विहिरीतून हरीणीला जीवनदान दिले

# नांदगाव तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहीर

| | | |
|---|---|---|
| 1 | श्रीरामनगर | ना.मा.प्र |
| 2 | फुलेनगर | GEN |
| 3 | क्रांतीनगर | ST |
| 4 | गिरणानगर | GEN |
| 5 | मल्हारवाडी | GEN |
| 6 | टाकळी खुर्द | GEN |
| 7 | बाणगाव बु. | GEN |
| 8 | हिंगणवाडी | ना.मा.प्र |
| 9 | कसाबखेडा | ना.मा.प्र |
| 10 | भार्डी | ST |
| 11 | बोयेगाव | GEN |
| 12 | पिंपरखेड | GEN |
| 13 | धोटाणे खु. | GEN |
| 14 | धनेर | ना.मा.प्र |
| 15 | नवसारी | SC |
| 16 | नागापूर | GEN |
| 17 | वडाळी खु. | SC |
| 18 | बोराळे | GEN |
| 19 | तळवाडे | ना.मा.प्र |
| 20 | हिरेनगर | ना.मा.प्र |
| 21 | लोढरे | GEN |
| 22 | लक्ष्मीनगर | GEN |
| 23 | शास्त्रीनगर | ST |
| 24 | मुळडोगंरी | ना.मा.प्र |
| 25 | कासारी | ना.मा.प्र |
| 26 | माणिकपूंज | GEN |
| 27 | ढेकू खु. | GEN |
| 28 | मळगांव | GEN |
| 29 | वेहेळगांव | GEN |
| 30 | बिरोळे | ना.मा.प्र |
| 31 | भालूर | SC |
| 32 | नवे पांझन | GEN |
| 33 | कोंढार | GEN |
| 34 | अस्तगांव | ना.मा.प्र |
| 35 | पांझनदेव | ना.मा.प्र |
| 36 | खादगाव | GEN |
| 37 | खिर्डी | GEN |
| 38 | टाकळी बु. | ST |
| 39 | मोहेगांव | ना.मा.प्र |
| 40 | सोयगांव | GEN |
| 41 | हिंगणदेहरे | ना.मा.प्र |
| 42 | जातेगांव | ना.मा.प्र |
| 43 | धोटाणे बु. | ना.मा.प्र |
| 44 | एकवई | GEN |
| 45 | बाणगांव खु. | GEN |
| 46 | दहेगांव | ST |
| 47 | बेजगांव | ST |
| 48 | हिसवळ खु. | ST |
| 49 | लोहशिगंवे | GEN |
| 50 | परधाडी | GEN |
| 51 | पिंप्रीहवेली | GEN |
| 52 | कुसूमतेल | ना.मा.प्र |
| 53 | जवळकी | ST |
| 54 | बोलठाण | GEN |
| 55 | बाभुळवाडी | ना.मा.प्र |
| 56 | न्यायडोगरी | GEN |
| 57 | पिंप्राळे | GEN |
| 58 | वाखारी | ना.मा.प्र |
| 59 | वंजारवाडी | ST |
| 60 | जामदरी | GEN |
| 61 | पानेवाडी | SC |
| 62 | भौरी | GEN |
| 63 | गंगाधरी | ST |
| 64 | पोखरी | GEN |
| 65 | चिंचविहीर | ST |
| 66 | हिसवळ बु. | SC |
| 67 | जळगांव खु. | GEN |
| 68 | जळगांव बु. | GEN |
| 69 | रोहिले बु. | GEN |
| 70 | आमोदे | GEN |
| 71 | सावरगांव | GEN |
| 72 | कऱ्ही | ST |
| 73 | सटाणे | GEN |
| 74 | पळाशी | ना.मा.प्र |
| 75 | अनकवाडे | ना.मा.प्र |
| 76 | मोरझर | GEN |
| 77 | मंगळने | ना.मा.प्र |
| 78 | गोंडेगांव | SC |
| 79 | तांदुळवाडी | GEN |
| 80 | मांडवड | ना.मा.प्र |
| 81 | साकोरा | ना.मा.प्र |
| 82 | रणखेडे | GEN |
| 83 | कळमदरी | GEN |
| 84 | वडाळी बु | GEN |
| 85 | नांदुर | GEN |
| 86 | दऱ्हेल | GEN |
| 87 | माळेगांव (क) | GEN |
| 88 | चादोरा | ना.मा.प्र |

**दैनिक आवाज ...**

**नांदगाव – तालुक्यातील दि. ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीकरीता तालुका निहाय सरपंच पदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सदर आरक्षण थेट/सोडतीने निश्चित करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील आदेशान्वये दि. २१ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता नांदगाव तहसिलदार यांचे कार्यालयात आरक्षण जाहीर करण्यात आले.**

# वेरुळला अक्षय तृतीया जपानुष्ठान सोहळ्याचे ध्वजारोहण उत्साहात



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक : प्रतिनिधी** – निष्काम कर्मयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधीश्वर अनंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतीगिरीजी मौनगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र वेरुळ पुण्यनगरीत अक्षय तृतीया निमित्त होणाऱ्या ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी ७१ फुटी उंच प्रमुख धर्म ध्वजासह विविध उपक्रमांच्या सहा धर्म ध्वजाचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

श्रीक्षेत्र वेरुळ येथील जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज आश्रम येथे उत्तराधिकारी अनंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत अक्षय तृतीयाच्या पर्वकालावर २८ एप्रिल ते ५ मे दरम्यान ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य दिव्य कार्यक्रमाची पूर्व तयारी म्हणून या सोहळ्याचे ध्वजारोहण मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी येथील जगद्गुरु बाबाजींच्या संकल्पित समाधी मंदिर परिसरातील ७१ फूट उंच धर्म ध्वजासह विविध उपक्रमांच्या सहा धर्म ध्वजाचे ध्वजारोहण मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाले.यावेळी मुख्य धर्म ध्वजाचे ध्वजारोहण आमदार संजय केनेकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. इतर ध्वजाचे ध्वजारोहण मान्यवर व काही विशेष भाविकांच्या हस्ते संपन्न झाले. लक्षवेधी पालखी मिरवणुकीने या सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला. मिरवणुकीत धर्म ध्वज घेतलेल्या भाविकांसह कलशाधारी महिला व कुमारिका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. उपस्थित भाविकांना जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी जगद्गुरु बाबाजींच्या प्रचंड कष्टमय व खडतर जीवन चरित्र याबद्दल माहिती दिली. जपानुष्ठान, यज्ञ परंपरेचे महत्व उपस्थितांना समजावून सांगितले. यज्ञ विविध प्रकारे केला जातो. जपयज्ञ, तपयज्ञ, स्वाध्याय यज्ञ आणि उदर भरण हाही एक यज्ञ आहे. काशी पेक्षाही जास्त पुण्य असलेल्या वेरुळच्या याच ऐतिहासिक पुण्य भूमीत जगद्गुरु जनार्दन स्वामींनी आपल्या जीवन कार्यातील सर्वात पहिला यज्ञ केला.

ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर आणि भगवान सिद्धेश्वराच्या या पवित्र भूमीत अक्षय तृतीयाच्या पर्वकालावर होणाऱ्या या सोहळ्यातील जपानुष्ठान,महायज्ञ आदी विविध उपक्रमात भाविकांनी सहभागी व्हावे.गुरुभक्ती करतांना समर्पित भाव व आज्ञा पालन महत्वपूर्ण आहे. असेही यावेळी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी सांगितले.यावेळी आश्रमीय पदाधिकारी, संत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाळीसगाव तालुक्यातील संरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**यशवंतराव ताडगे,चाळीसगाव/प्रतिनिधी:–** चाळीसगाव तालुक्यातील ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण तहसील कार्यालयात तहसीलदार व प्रांतधिकारी यांनी नुकतेच सोडतीद्वारे जाहीर केले आहे. चाळीसगाव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग सरपंच पदाचे आरक्षण निश्चीत कराण्यासाठी तहसीलदार प्रशांत आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोडत सभा सकाळी ठीक ११ वाजता घेण्यात आली. लहान बालकाच्या हातून चिठ्या काढून निश्चीत केलेल्या सरपंच पदामधून अनु. जाती महिला, अनु. जमाती महिला, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे सरपंच पद थेट सोडतीने निश्चीत करण्याकरीता उपविभागीय अधिकारी प्रमोद हिले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता सभा घेण्यात आली. त्यानुसार सरपंच पदाच्या सन २०२५–२०३० या कालावधीसाठी आरक्षण सोडत निश्चीत करण्यात आले. तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींपैकी तब्बल ५६ ग्रामपंचायतींच्या खूर्चीवर महिला राज येणार असून आहे. पुन्हा एखादा नारी शक्तीचे राज येणार असले, =तरी महिला सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीमुळे झेरॉक्स सरपंच पदाला ऊत येणार आहे. अनेक गावातील मातब्बर प्रस्तापितांचे स्वप्न भंगले आहे.

सरपंच पदाच्या आरक्षणाकडे तालुक्याचे लक्ष लागलेले होते. तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण याप्रमाणे, असणार आहे. आजी माजी आमदार यांच्या गावांतील सरपंच पदाचे आरक्षण – आमदार मंगेश चव्हाण– हिंगोणे खुर्द–सर्व साधारण महिला भाजप पक्षाचे माजी खासदार, आमदार,व आता ठाकरे उद्धव ठाकरे गटाचे – उन्मेष पाटील–दरेगाव–अनुसुचीत जाती–महिला माजी राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे माजी आमदार राजीव–देशमुख–तळेगाव–नागरीकांचा मागास प्रवर्ग–पुरुष अनेक गावांमध्ये प्रस्थापितांना धक्का माजी खासदार ता उन्मेष पाटील यांच्या दरेगावात, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड यांच्या वलठाणमध्ये, पोपटतात्या भोळे वाघळी यांच्या वाघळीमध्ये, संजय भास्कर पाटील यांच्या पातोंडा यात गावात सरपंच पद आरक्षीत झाले आहे. दुसरीकडे तळेगाव, पिलखोड, देवळी, खेडगाव, कोदगाव, पाटणा, जामदा, सायगाव, दहिवद, मेहुणबारे, बहाळ, उंबरखेड, हिरापूर या गावांमध्ये मात्र पारंपारीक लढती अटळ असल्याचे आरक्षण सोडतीवरून दिसून येते. अनुसुचीत जाती प्रवर्ग सरपंचपद– लोंजे ज (महिला), शिंदी, (महिला), दरेगाव– महिला माळशेव (महिला), वलठाण, अंधारी, बाणगाव गणेशपूर (महिला), बोरखेडा खुर्द, टाकळी प्र.चा. जुनोने (महिला), वडाले वडाळा(महिला).

अनुसुचीत जमाती प्रवर्ग सरपंच पद–खेरडे (महिला), आडगाव, रोकडे, डोणगिर (महिला) पोहरे, खेडी, खुर्द, महिला, टाकळी प्र. दे. वाघळी तळोदे, प्र. चा.महिला, वाघले, पिंप्रीखुर्द महिला भोरस बुद्रुक, राजणगाव, बोरखेडा, बुद्रुक, तांबोळे, बुद्रुक, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) सरपंच पद– – दस्केबर्डी (महिला), तळेग खडकी बुद्रुक( महिला), ओझर (महिला), पिलखोड( महिला), कृष्णा नगर,जामदा,नांद्रे न्हावे महिला, जांमडी प्र ब लोंढे, महिला, सायगाव देवळी महिला, खेडगाव कोदगाव बेलदारवाडी पाटणा पिंपरी बुद्रुक प्र. चा. (महिला,) पाटणा, पिंपरी बुद्रुक,बोढरे, चिंचगव्हाण (महिला) टेकवाडे खुर्द , गोरखपूर( महिला), पिंपरखेड (महिला) सर्वसामान्य सरपंच पद – पिंपळवाड निकुंभ, हातले,शिरसगाव( महिला) शिदवाडी (महिला ), दहिवद, चितेगाव, दसेगाव बुद्रुक,कुंझर (महिला ), चांभारडी खुर्द (महिला ),तरवाडे बुद्रुक (महिला), पिंपरी बुद्रुक प्र.दे. ( महिला), अलवाडी( महिला), पिंपळवाड म्हाळसा करंजगाव (महिला), खडकी सिम, मेहुनबारे (महिला), बहाळ,उंबरखेड, रहिपुरी महिला), भामरे बुद्रुक, रोहिणी,( महिला) ब्राह्मण शेवगे हातगाव वाकडी( महिला),देशमुखवाडी पळासरे, रामनगर (महिला ) तमगव्हाण, मादुरणे, वाघडू (महिला ) डांबरून विसापूर तामसवाडी (महिला ), धामणगाव( महिला ), भवाळी मुंदखेडे बुद्रुक, सेवानगर (महिला ), चांभारडी बुद्रुक (महिला ), कळमडू,भऊर राजदेहेरे, चिंचखेडे (महिला ), वडगाव लांबे, ओढरे, तळोदे प्र. दे.( महिला ), पिंपळगाव (महिला),हिंगोणे खुर्द (महिला ), तिरपोळे(महिला,) वरखेडे बुद्रुक, घोडेगाव (महिला), आंबेहोळ ( महिला) तालुक्यातील ११० सरपंचांमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग पुरुष–२७, सर्वसाधारण महिला–२८ नागरीकांचा मागास प्रवर्ग ओबीसी पुरुष–१३, नागरीकांचा मागास प्रवर्ग ओबीसी महिला–१३, अनुसुचीत जाती प्रवर्ग पुरुष–६, अनुसुचीत जाती प्रवर्ग महिला–६. अनुसुचीत जमाती पुरुष ८. अनुसुचीत जमाती महिला–९ या प्रमाणे सरपंच पदाचे आरक्षण निघाले आहे. तर करगाव, चैतन्यतांडा व इच्छापुर तांडा या ग्रामपंचायतीचे आरक्षण यापूर्वीच जाहीर झाले आहे. दरम्यान टाकळी चे माजी उपसरपंच व ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोर्वेकर यांनी ओबीसींच्या आरक्षणासाठी सुप्रीम कोर्टात याचिका असताना आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास लेखी हरकत घेऊन, तहसील वप्रांताधिकारी यांना लेखी हरकत (तक्रार) नोंदविली. त्यांची तक्रार पुढील कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात येणार आहे असे सांगण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ – ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# संघर्षातून 'लोकनेता'...संजयबाबा घाटगे

*खरं तर माजी आमदार संजयबाबा घाटगे यांच्या सारखा साठ वर्षापुर्वी इंग्रजी माध्यमातून पदवी घेतलेला नेता व त्यांची पार्श्वभूमी पाहता एखाद्या कार्पोरेट शहरात सुखाने आयुष्य जगला असता. देशाला एक चांगला क्रिकेटचा खेळाडू मिळाला असता. परंतू या सर्व मोहात न पडता त्यांनी ग्रामिण भागाशी आपली नाळ जोडली केनवडे-गोरंबे, साके - व्हनाळी च्या टापूत ज्या टिकाणी तण उगवायची धाडस करत नव्हतं अशा ठिकाणी त्यांनी अन्नपुर्णा पाणी योजनेच्या माध्यमातून डोंगर माथ्यावर हिरवाई फुलवली. हे झाले नसते तर इथले लोक आयुष्यभर दारिद्र्याचे जिने जगले असते. परंतू संजयबाबा घाटगे यांच्या सारखा संघर्ष करणारा नेता या भागाला लाभल्यामुळे केवळ ही चार गावेच नव्हे तर राजकारणाच्या माध्यमातून त्यांनी शास्वत विकासाचे सुत्र घेवून सर्वसामान्यांच्या पिढ्यान-पिढ्याचे कोटकल्याण त्यांनी केले आहे. ख-या अर्थाने जनतेचा सेवक म्हणून करणा-या या लढावू नेत्याचा आज वाढदिवस आहे त्यानिमित.....*

**दै. आवाज वृत्तसेवा...**

संजयबाबा घाटगे यांनी ग्रामिण भागातील दुखः दारिद्र्य,अंधश्रद्धा दुर करण्यासाठी शहर सोडून ग्रामिण भाहगात येण्याचा घेतलेल्या निर्णयाने त्यांना आयुष्यभर संघर्ष करायला लावला. परंतू समाजाचं हित करण्यासाठीचा लागलेला ध्यास यामुळे ते वयाच्या या टप्पापर्यंत संघर्षच करत आहेत. प्राप्त परिस्थीती नुसार आपल्या लोकांसाठी घेतलेले कडू -गोड निर्णय आणि या सर्वामुळे तावून सुलाखून तयार झालेला संजयबाबा घाटगे गट म्हणजे कागल च्या राजकिय विद्यापीठातील राजकारणाचा माईलस्टोन आहे. कोणत्याही मोठ्या राजकिय आर्थीक सत्ता नसताना व अनंत अडचणी असताना यवढ्या मोठ्या प्रमाणावर राजकिय गट टिकवून ठेवणे साधी सोपी गोष्ट नाही. परंतू कार्यकर्त्यांनाच आपला श्वास मानून काम करणा-या संजयबाबा घाटगेंना हे सहज शक्य झाले आहे.

संस्थांची उभारणी....

आपल्या ग्रामिण लोकांचे जीवन मान उंचावायचे असेल तर इथल्या लोकांना शेतीसाठी मुबलक पाणी मिळणे गरजे होते. याचा विचार करून त्यांनी 'अन्नपुर्णा ' सारखी डोंगर द-यासाठी महत्वपुर्ण अशी असणारी पाच हजार कमांड एरिया असणारी राज्यातील एकमेव अशी पाणी पुरवठा योजना उभारली. आणि ती यशस्वीपणे चालवून कर्जमुक्तही करून दाखवली. यातून मिळणा-या चा-यातून शेतक-यांच्या दुग्ध व्यवसाय चालावा म्हणून त्यांनी समृद्धी दुध प्रकल्पाची निमिर्ती केली. याशिवाय राजकिय दुर्ष्टया आपल्या कार्यकर्त्यांचा ऊस वेळेत जावून त्यांना दोन पैसे हातात मिळावेत यासाठी त्यांनी 'अन्नपुर्णा' शुगर ॲण्ड जॅगरी वर्क्स लि,केनवडे या कारखान्यांची उभारणी केली. हे करीत असताना तत्कालीन राजकीय विरोधकांनी त्यांना प्रचंड त्रास दिला मिळालेले परवाने रद्द केले परंतू संजयबाबा या परिस्थीतीतही डगमगले नाहीत.

राजकिय कारकिर्द....

संजयबाबा घाटगे यांच्या राजकिय कारकिर्दीची सुरूवात पंचायत समिती च्या माध्यमातून झाली. या काळात सभापती असताना त्यांनी गोरगरीबांसाठी (घरे,विहीरी,कपडे धुण्याचे घाट,शिलाई मशिन,शेती औजारे) अशा विविध योजना इतक्या



प्रभावीपणे राबविल्या होत्या की,बहुजन समालाजा संजयबाबा घाटगे हे आपल्याच घरातील आहेत इतकी जवळीक वाटायची.

**शब्दांकन- बाजीराव पाटील, केनवडे व्हा चेअरमन: अन्नपूर्णा पतसंस्था**

संजयबाबा घाटगे यांनी आपल्या एकुण आयुष्यात देशासाठी लढणारे जवान,समाज घडविणारे शिक्षक, डॉक्टर, पत्रकार यांचा कधीही त्यांनी अनाधर केला नाही उलट या सर्वांना ज्या ज्या माध्यमातून स्थर्य देता येईल तेवढे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे. आपल्या तेरा महिन्यांच्या आमदारकीच्या काळात कागल- मुरगूड बसस्थानक,बानगे-सोनगे नदीवरील पुल,नागणवाडी-झुलपेवाडी प्रकल्प अशी असंख्य शास्वत विकासाची त्यांनी केलेली अनेक कामे आजरी चिरंतन आहेत.

शैक्षणिक दुर्ष्टीकोन...

आपल्या भागातील ग्रामिण मुला-मुलींना शिक्षणासाठी करावी लागणारी पायपीट उच्चशिक्षणासाठी येणा-या अडचणी याचा विचार करून संजयबाबा घाटगे यांनी ग्रामिण भागातच केजी पासून १२ वी पर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. शिवाय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि आता आलीकडेच दुग्ध व्यवसाय व्यवस्थापण पदविका असे व्यवसाईक अभ्यासक्रमही सुरू केले आहेत. ज्याच्यातून आजच्या तरूणांनी स्पर्धेच्या युगात केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय देखील उभारावा कोणीही गरजू न राहता त्याला कोणापुढे हात पसरायला लागू नये असीच विकासाची दुर्ष्टी त्यांची आहे.

संघर्ष पाचवीलाच......

ज्या क्षणी संजयबाबांनी शहर सोडून ग्रामिण भागाच्या कल्याणासाठी खेड्यात राहण्याचा निर्णय घेतला त्याच क्षणापासून संघर्ष त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. आजपर्यंत मिळालेल्या आणि निमिलेल्या सर्व गोष्टीत त्यांना प्रचंड राजकिय संघर्ष करावा लागला. पदोपदी अडवणूक झाली राजकारणात मोठा होवू नये म्हणून जवळच्यानीच त्यांना ऱोखण्याचा कायम पणे प्रयत्न केला परंतू जन्मातच लढावू बाणा असल्याने संजयबाबा घाटगे या वादळातही टिकले. दिवंगत प्रा.एन.डी.पाटील यांच्या सारख्या लढावू नेत्या सोबत राहून त्यांनी अनेक अनेक आंदोलने यशस्वी केली.त्यामध्ये वाढीव वीजदरवाढ,वाढीव पाणी पट्टी,शेतक-यांची कर्जमाफी अशी कितीतरी आंदोलने त्यांनी लढा उभारून यशस्वी करून दाखवली. आतातरी त्यांनी शेतक-यांना देशोधडीला लावणा-या नागपूर-गोवा शक्तीपीठ या नवीन महामार्गाच्या विरोधात आंदोलन छेडले आहे. यश मिळेपर्यंत चिकाटीने संघर्ष करत राहणारे संजयबाबा घाटगे हे देखील आंदोलन यशस्वी करतील यात शंकाच नाही.

**कार्यकर्त्यांच्या हितासाठीच.....**

**कोणत्याही मोठ्या राजकिय तसेच आर्थीक सत्ता नसल्यामुळे आपल्या कार्यकर्त्यांना स्वासथ्य देण्यासाठी त्यांनी अनेक राजकिय निर्णय घेतले. या मध्ये त्यांनी कधीच वयक्तीक स्वार्थ दाखवला नाही. आपल्या सोबत असणारे जिवाभावाचे कार्यकर्ते हेच आपला श्वास आहेत असे समजून आजही त्यांचे समाजकार्य सुरू आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना स्वास्थ देण्यासाठीच त्यांनी आता भाजपमध्ये प्रवेश केला आहे.**

**नशीब आणि दुर्दैव....**

**संघर्ष आणि संजयबाबा अशा एकाच नान्याच्या दोन बाजू असणा-या या नेत्याला नशीबीने कायमच हुलकावणी दिली आहे. स्वकियांचे पाठीवरील वार झेलताना आणि संघर्ष करत करत संजयबाबांचा उमेदीचा काळ निघून गेला आहे. आताच्या राजकिय परिस्थितीतही संजयबाबांना नशीबीने इतकी हुलकावणी दिली आहे कि त्यांचे नशीब लिहीताना देव झोपला होत की काय ? असे म्हणण्याची वेळ आली आहे.**









# कोपरगाव तालुक्यातील अवैध धंदे बंद होतील का ?

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**रमेश भोंगळ, कोळपेवाडी प्रतिनिधी :–** कोपरगाव शहरातील मध्यवर्ती भागात गुरुद्वारा रोडवर असणाऱ्या सचिन वॉंच घडाळ्याच्या दुकानावर सहा दरोडेखोरांनी दुकानाचे शटर उचकावुन ३२ लाखाच्या महागड्या घड्याळासह रोख रक्कम लुटून पोबारा केल्याने तालुक्यात कायद्या सुव्यवस्था ढासाळुन तालुक्याचा कारभार गुन्हेगारी प्रवृत्ती चालवत आहेत कि काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.



वरील चोरीच्या घटने नंतर आमदार आशुतोष काळे यांनी लोहाडे बंधू च्या सचिन वॉंच सेंटर ला भेट देत घटनेची माहिति घेत पोलीस प्रशासनास तपासाला गती देवुन गुन्हेगारांवर पोलीसाचा वचक निर्माण करुन आरोपी पकडण्याची केलेली मागणी जनतेचा प्रतिनिधी म्हणून रास्त असली तरी?येथून मागे झालेल्या धाडशी चोर्याचे काय ? त्याचा तपास लावायला पोलीस प्रशासनाला कोणी राखले होते ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थितीत होत असुन शहरासह तालुक्यात एक दिवस टळत नसेल कि आज चोरी झाली नाही. मागील गुन्हाचा तपास लागलेला नसल्याने गुन्हा नोंदवुन मुद्देमाल मिळेलच याची श्वास्वती जनतेला पोलीस प्रशासनाकडून राहिली नसल्याने बंहुतांश मुद्देमाल चोरीचे गुन्हे नागरिक नोंदवतच नसल्याने गुन्हेगार मालाची विल्हेवाट लावुन आलेल्या पैशात मौजमजा करुन दुसरे सावज हेरण्यात मोकळे होतात . शहरातील व्यापार्यांनी अध्यक्ष काका कोयटे यांच्या मार्गदर्शना खाली स्वंयस्फुर्ती ने पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधत चोरीचा तपास लावण्याची मागणी केली. गुन्हेगारी चे मूळ असणार्या अवैध धंद्याकडे आमदार महोदया चे या चोरी च्या घटनेवरुन लक्ष गेले हि बाब नसावी थोडकी ? अवैध व्यवसाय करणारा कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असला तरी त्याची गय न करता कडक कारवाई करा अशा शब्दात आ.आशुतोष काळे यांनी पोलीस प्रशासनाला केलेल्या सुचना काम दाखवा अन्यथा चालते व्हा पाणी आत्ता डोक्यावरुन फिरले असुन जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहु नका असल्याची भावना जनतेप्रती बोलुन दाखवली. अवैध व्यवसाया मध्ये मोडणारे सर्वच धंदे शहरासह तालुक्यात जोरात सुरु असून कोणी मोठ्या भांडवल दाराने भरगच्च हप्ता चे प्रशासनास लालच दाखवले तर डान्सबार वेश्या व्यवसाय करण्यास देखील अनुमती मिळेल ही तालुक्यात शोकांतिका बनली आहे.

## ग्रामदैवत आई नवलाई–भैरी पुनः प्राणप्रतिष्ठा

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**रवींद्र मालुसरे, मुंबई –** सुभेदार नरवीर तान्हाजी आणि सूर्याजी मालुसरे यांच्या साखर गावाचे ग्रामदैवत आई नवलाई–भैरी यांची पुनः प्राणप्रतिष्ठा ( जीर्णोद्धार ) आणि पुनर्रचित मंदिराचा उद्घाटन सोहळा दिनांक २४ व २५ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण दोन दिवस धार्मिक आणि पारंपरिक रितिरिवाज पूर्ण करून पोलादपूर तालुक्यात संपन्न होत असल्याचे अध्यक्ष विनायकदादा मालुसरे आणि संतोष महादेव मालुसरे, यांनी पत्रकार परिषदेद्वारे सांगितले आहे. दि. २३ एप्रिल २०२५ सकाळी ७ वाजता नवीन मूर्तीचे आगमन त्यानंतर शोभायात्रा. २४ एप्रिल वेदशास्त्र संपन्न गुरुजी-संजय कुलकर्णी यांच्या हस्ते धर्मिक विधी होणार आहे.२५ एप्रिल २०२५ सकाळी ८ वाजता मुख्यदेवता आई नवलाई आणि जोगेश्वरी, वाघजाई, भैरी, बापदेव, महादेव, जननी, सालूबाई, कालभैरी या मूर्तींची स्वानंद सुखनिवासी प. पू. गुरुवर्य अरविंद नाथ महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा कलशारोहन - परमपूज्य योगीराज ब्रह्मचारी ह. भ. प. एकनाथ महाराज लाखे होणार आहे. दुपारी १ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हलगीवादक राजू आवळे पथक यांचे हलगी वादन. या धार्मिक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन. भरत चिमाजी चोरगे (उपाध्यक्ष), बाजीराव विठोबा मालुसरे (सचिव), सखाराम रामचंद्र बांद्रे (खजिनदार) दीपेश परशुराम मालुसरे (कार्याध्यक्ष) यांनी केले आहे.

## अतिक्रमणमुक्त आणि हरित श्रीरामपूर शहरासाठी कटिबद्ध – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**शिर्डी, दि.२१ –** येत्या काळात श्रीरामपूर शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी, शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी उपाययोजना करण्यासोबत शहर हरित करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

श्रीरामपूर येथे तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा, जलजीवन मिशन व महावितरण विभागांच्या कामकाजाचा आढावा बैठकीत श्री. विखे पाटील बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती सुनंदा नरवाडे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, तहसीलदार मिलिंद वाघ आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, जलजीवन मिशनचे काम करतांना पाण्याचे स्रोत शोधल्यानंतर पाईप खरेदी करावी. उन्हापासून पाइप खराब होऊ नयेत यासाठी पाईप बंदीस्त ठिकाणी ठेवावेत. जलजीवन मिशनच्या कामात गुणवत्ता ठेवावी. कामात अनियमितता करणाऱ्या ठेकेदारांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीबाबत ग्रामस्थांच्या तक्रारींची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन निकृष्ट कामांची, अनियमितेची चौकशी करण्यात यावी.

## नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित पद्मविभूषण श्री रतन टाटा स्मृती व्याख्यान संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**नाशिकरोड :–** आयआयएस म्हणजे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स द्वारे नवनवीन आधुनिक तंत्र व कौशल्य उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देऊन या द्वारे प्रशिक्षण देऊन मोठ्या उद्योग समूहात संधी उपलब्ध करून रोजगारक्षम बनवणे गरजेचे असून रतन टाटांनी टाटा मोटर्स व टाटा टी प्रकल्प उभारतांना अनेक जागतिक मोठ्या उद्योगाचे तंत्र व कौशल्य व घेतलेल्या मेहनतीने आपले अनेक प्रकल्प नावारूपाला कसे आणले. नवनवीन एआय व ब्लॉक चेन सारखे तंत्र कौशल्ये प्राप्त करून ज्ञान आदानप्रदान माध्यमातून ग्लोबल मार्केट मध्ये आपले स्थान मिळवा, असे टाटा ट्रस्टचे एच. एन. श्रीनिवास यांनी मार्गदर्शन करतांना केले. गोखले




एज्युकेशन सोसायटी नाशिक वतीने दि. १९ एप्रिल २०२५ रोजी गुरुदक्षिणा सभागृहात झालेल्या पद्मविभूषण श्री रतन टाटा स्मृती व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून मार्गदर्शन करतांना बोलत होते. त्यांनी आपल्या ट्रस्ट मार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची व कौशल्य प्रशिक्षण राष्ट्र उभारणीत महत्वपुर्ण योगदान कसे देऊ शकतो याबाबत माहिती दिली. याप्रसंगी मंचावर टाटा ट्रस्टचे एच. एन. श्रीनिवास, युनिव्हर्सल ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर प्रशांत खंबासवाडकर, संस्थेचे प्रेसिडेंट डॉ. आर. पी. देशपांडे, नाशिक विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, प्रकल्प संचालक डॉ. पी. एम. देशपांडे, अक्षय देशपांडे, प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी, आस्थापना संचालक शैलेश गोसावी, केंद्रीय समन्वय समितीच्या समन्व्यक डॉ.अंजली कुलकर्णी, डॉ. एस. व्ही. संत या मान्यवरासह कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव व खजिनदार प्राचार्याडॉ. दिप्ती देशपांडे होत्या. कार्यक्रमाचा प्रारंभ एसएमआरके महाविद्यालयाची विद्यार्थीनी ज्ञानेश्वरी बागुल हिने ईशस्तवन सादर करून सोसायटी गीताने झाले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचा परिचय संस्थेच्या सचिव डॉ. दीप्ती देशपांडे यांनी करून दिला. सन्माननीय अतिथी प्रशांत खंबासवाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. दीप्ती देशपांडे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक यासह विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला सूत्रसंचालन डॉ. स्नेहा रत्नपारखी व डॉ. मुग्धा जोशी यांनी केले तर आभार सहायक शाखा सचिव डॉ. प्रणव रत्नपारखी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य डॉ लीना भट व त्यांच्या सर्व टीमने परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळ, कोकण विभाग ठाणे जिल्हा प्रेरित कार्यकर्ता मेळाव्यात

# समाजरत्न आणि समाजभूषण पुरस्कारांचे वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**शरद लोहकरे, लासलगाव –**
श्री संत सेना महाराज जयंती निमित्त, सत्यनारायणाची पुजा आयोजित करून, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, कोकण विभाग ठाणे जिल्हा विभागाच्या वतीने नुकताच भव्य कार्यकर्ता मेळावा श्री क्षेत्र टिटवाळा येथे संपन्न झाला. या मेळाव्याचे आयोजन सामाजिक ऐक्य, संघटन बळकटीकरण आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गौरवासाठी करण्यात आले होते. कार्यक्रमामध्ये समाजासाठी कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रांतील नामांकित व्यक्तींना समाजरत्न आणि समाजभूषण या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सयाजीराव झुंजार, कोल्हापूर आणि महामंडळाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी संघटनेच्या कार्याची प्रशंसा केली व युवकांनी सामाजिक कार्यात अधिक संख्येने सहभागी व्हावे, १९८१ साली कै.हनुमंतराव साळुंखे तात्या, ना भू संगमवार, शंकरराव जगताप वामनराव देसाई, जननायक भारतरत्न कर्पुरी ठाकूर यांच्या योगदानातून महाराष्ट्र नाभिक महामंडळाची स्थापना झालेली आहे .ज्याला जे योगदान समाजासाठी देता येईल ते योगदान आपापल्या परीने प्रत्येकाने द्यावे, समाज मोठा असतो समाजापेक्षा कोणीही मोठे असत नाही ही भावना प्रत्येकाने जपायला हवी तुम्ही ज्या क्षेत्रात आहात त्या क्षेत्रात राहून आपल्या समाजाला महाराष्ट्र नाभिक महामंडळाला जे योगदान देता येईल तो प्रामाणिक प्रयत्न करा सध्या सलून व्यवसायामध्ये जो अध्याधुनिकपणा आला आहे तो स्वीकारण्याची नवीन पिढीने तयारी ठेवावी आणि तशा पद्धतीने इतर समाजाला आवश्यक असलेल्या हेअर इंडस्ट्री मधील सर्व गोष्टी अत्याधुनिक सेवा देण्यासाठी सज्ज व्हावे आपल्या मुलांना शिक्षण जरूर द्या पण सुशिक्षित पिढी जर सर्व इंडस्ट्रीमध्ये आली तर येणाऱ्या काळात नाभिक समाज शंभर टक्के सक्षम होईल असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. समाजात विविध संघटना निर्माण झाल्या असल्या तरी महाराष्ट्र नाभिक महामंडळ ही अशी संघटना आहे ग्रामीण भागातील वाडीवस्ती पासून महाराष्ट्राच्या मुंबईसारख्या शहरापर्यंत




सर्वांना जोडण्याचे काम महामंडळाने केले आहे. या मंडळाची सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. कार्यक्रमाला नाशिक, लासलगाव, ठाणे, भिवंडी, कोल्हापूर, रायगड आणि इतर कोकण विभागातील विविध जिल्ह्यातील आणि तालुक्यांमधून कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी नगरसेवक अनिल पंडित यांनी आपल्या भाषणात, नाभिक महामंडळाच्या नावाने इतर ज्या काही संस्था कार्यरत आहेत त्यांनी सामाजिक बांधलकी आणि एकोपा दाखवून महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या एका छताखाली येण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन कोकण विभाग ठाणे जिल्हा सेक्रेटरी भाऊसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नाभिक सेवा संस्था, मांडा - टिटवाळा मंडळ यांच्यावतीने करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी नगरसेवक अनिलजी पंडित यांनी भूषविले.

सदर मेळाव्यात सयाजीराव झुंजार( महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ), दत्ताशेठ अनारसे ( माजी प्रदेश अध्यक्ष ), अनिलजी पंडित ( माजी नगरसेवक कल्याण डोंबिवली महानगरपालिका), महादेवजी चव्हाण ( महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष), भाऊसाहेब शिंदे (कोकण विभाग सेक्रेटरी ), घनश्यामजी वाघ (महाराष्ट्र प्रदेश सेक्रेटरी), अरविंद बाबुराव देसाई, लासलगाव, नागेश जी जाधव,भिवंडी., महावीर गाडेकर, यांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तर, संजय साळुंखे (ठाणे जिल्हा अध्यक्ष), धनंजय गायकवाड (ठाणे जिल्हा उपाध्यक्ष), ओम प्रकाश भाटिया (ठाणे जिल्हा सल्लागार), संतोषजी बिडवे (विठ्ठल रुक्मिणी मंदिर मुंबई सेक्रेटरी), श्री दिगंबर सोनवणे (ज्येष्ठ कार्यकर्ते), बळीरामजी भोईर, भास्करराव खंडागळे, वसंतराव वाघ सर, यांना समाज भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी पणे पार पाडण्यासाठी, नाभिक सेवा संस्था, मांडा - टिटवाळा विभागातील यशवंत पालेकर, ओमप्रकाश भाटिया, धनंजय गायकवाड, ज्ञानेश्वर वाघ, सुरेश भाटिया, प्रशांत गवळी, अब्दुल खलिफा, धनंजय रायकर, शरद कणसे, अंकुश कणसे तसेच संत सेना महाराज मंडळ अटाळी, विभागातील संजय साळुंखे, निरंजन शिंदे, गोरख औटी, प्रशांत सपकाळ, गोरख कडवे, निवृत्ती शिंदे, दिलीप शिंदे, नितीन शिंदे, बाळू शिंदे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब शिंदे, कोकण विभाग सेक्रेटरी यांनी केले.